# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट क्रमांक २३५/२०२४** **दिनांक - २१/०६/२०२४**

**" गॅलेक्सी हॉटेलच्या बाहेर, फायर ब्रिगेड जवळ नालासोपारा पुर्व येथे कारवाई करुन अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या पुरुष आरोपीस अटक करुन दोन पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश "**

आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील गॅलेक्सी हॉटेलच्या बाजुला, फायर ब्रिगेड जवळ वसंतनगरी,नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर याठिकाणी एक पुरुष वेश्यादलाल हा वेश्यागमनाकरीता गॅलेक्सी हॉटेलच्या बाजुला नालासोपारा पश्चिम येथे मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच तसेच असे सदर ठिकाणी जावुन दि. १८/०६/२०२४ रोजी कारवाई करुन पुरुष वेश्या दलाल अभिषेक चंद्रभान तिवारी वय ३० वर्षे यास अटक करुन दोन महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे वेश्यादलाल अभिषेक याचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता त्याने सांगितले की, मी एका मुलीचे ३५००/- रु. घेतो .आपणास कबुल असेल तर गॅलेक्सी हॉटेलच्या बाजुला, फायर ब्रिगेड जवळ नालासोपारा पुर्व येथे येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने त्यास होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह गॅलेक्सी हॉटेलच्या बाजुला, फायर ब्रिगेड जवळ गेले असता वेश्यादलाल अभिषेक चंद्रभान तिवारी याने बोगस गिऱ्हाईकास दोन महीला दाखवल्या व त्यामधुन तुम्ही पसंद करा व माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे एक महीला पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे त्यास पैसे दिले असता बोगस गिऱ्हाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक पुरुष दलाल आरोपीत नामे अभिषेक चंद्रभान तिवारी वय ३० वर्षे यास ताब्यात घेतले. व दोन महीला पिडीत यांची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे **अभिषेक चंद्रभान तिवारी वय ३० वर्षे रा. ए/२०३, रॉक्सो अपार्टमेंट, गाळानगर, मुळ रा. ग्राम हरकमलपुर, पोलीस थाना सिकारपुर, जि. जोनपुर उत्तर प्रदेश याने** पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे ३५००/-रु. घेतो व त्यातील ५००/- रुपये पिडीत महीलांना देत असतो.

तरी सदर  पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद पुरुष दलाल आरोपीत यास अटक करुन आचोळे पोलीस ठाणे गु.रजि.नं. २४४/२०२४ भादविस कलम ३७० सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे आरोपीत अभिषेक चंद्रभान तिवारी वय ३० वर्षे याचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री.गायकवाड साो,परिमंडळ ०१ (अतिरिक्त कार्यभार), सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) श्री पुकळे सो (अतिरिक्त कार्यभार), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार  व सफौ/गवई, मपोहवा/०५००४ डोईफोडे, पोहवा/०७०५५ शेटये, चालक पोहवा/०७०६६ पागी, मपोहवा/०८००३ तिवले, पोहवा/१०००२ शिंदे, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

-ooooooooo-